# '' भिवंडी तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार उपलब्ध भौतिक सुविधांचा अभ्यास.''

लेखिका: सौ.मनिषा दयाघन पाटील[१] आणि डॉ. संजय निंबाळकर[२]

[१] पीच.डी.संशोधिका, सेवासदनचे शिक्षणशास्त्र महाविदयालय, उल्हासनगर

[२]सह अध्यापक, सेवासदनचे शिक्षणशास्त्र महाविदयालय, उल्हासनगर

## सारांश

डॉ. कोठारी यांनी भारतीय शिक्षण आयोगात नमूद केले की, ''भारताचे भवितव्य वर्गखोल्यामधून घडत आहे.'' या भवितव्याची योग्यरितीने जोपासना करायची असेल, उदयाची पिढी निकोप, निरोगी, सक्षम, सुदृढ घडवायची असेल तर त्यासाठी पोषक वातावरण शाळेतून पुरविणे गरजेचे आहे. शिक्षण हे समाज विकासाचे प्रभावी साधन आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेवरच समाजाची गुणवत्ता ठरत असते. शाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली तर त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता सुधारली जाईल. कारण वातावरण या घटकाचा खूप प्रभाव व्यक्तिमत्त्व घडविण्यात होत असतो.

याचसाठी संशोधिकेने प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार उपलब्ध भौतिक सुविधांचा अभ्यास करण्याचे ठरविले. भिवंडी तालुक्यातील ५० प्राथमिक शिक्षकांची निवड न्यादर्श म्हणून केली व स्वरचित प्रश्नावली द्वारे माहिती संकलित करून शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राद्वारे माहितीचे विश्लेषण केले.

संशोधनाअंती असे आढळले की, भिवंडी तालुक्यातील बहुतांशी प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार भौतिक सुविधा उपलब्ध असून भौतिक सुविधांचे अनेक सकारात्मक परिणाम शिक्षणप्रक्रियेवर झालेले दिसून आले.

**बीजसंज्ञा:** शिक्षण हक्क अधिनियम २००९, भौतिक सुविधा.

## प्रस्तावना

डॉ. कोठारी यांनी भारतीय शिक्षण आयोगात नमूद केले की, ''भारताचे भवितव्य वर्गखोल्यामधून घडत आहे.'' या भवितव्याची योग्यरितीने जोपासना करायची असेल, उदयाची पिढी निकोप, निरोगी, सक्षम, सुदृढ घडवायची असेल तर त्यासाठी पोषक वातावरण शाळेतून पुरविणे गरजेचे आहे. शिक्षण हे समाज विकासाचे प्रभावी साधन आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेवरच समाजाची गुणवत्ता ठरत असते. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षणाचे आधुनिकीकरण करणे अपरिहार्य आहे. यासाठीच शिक्षण क्षेत्रात नवीन क्रांतीकारी बदल घडतात व कालानुरूप शैक्षणिक धोरणामध्ये बदल केले जातात. शैक्षणिक धोरणांचे बदल हे चांगले किंवा वाईट या स्वरूपात अनुभवास येतात. त्यातील महत्त्वपूर्ण बदल म्हणजे भारतीय संविधानाने अंमलात आणलेला शिक्षण हक्क अधिनियम २००९ होय.

विदयार्थ्यांमध्ये शिक्षण, संस्कृती रूजण्यासाठी व शालेय वातावरण शिक्षणमय होण्यासाठी, शाळेत भौतिक सुविधांचा दर्जा उत्कृष्ट असावा लागतो. निव्वळ भौतिक सुविधा म्हणजे गुणवत्ता नसली तरी शाळांमधील भौतिक सुविधांचा अभाव गुणवत्तेच्या मार्गातील मोठा अडथळा आहे. यासाठी शाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली तर त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता सुधारली जाईल. कारण वातावरण या घटकाचा खुप प्रभाव व्यक्तिमत्त्व घडविण्यात होत असतो.

शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार किमान खालील भौतिक सुविधा असणे आवश्यक आहे.

१. इमारत
२. स्वतंत्र वर्गखोल्या
३. मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह
४. मुख्याध्यापक कार्यालय
५.पिण्याच्या पाण्याची
६. रॅम्प
७. खेळाचे मैदान

**संशोधनाचे उद्दिष्ट**

भिवंडी तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार उपलब्ध भौतिक सुविधांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गरज व महत्त्व**

मुलं म्हणजे आपली सर्वात मोठी राष्टीय संपत्ती आहे. मुलांचे शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे देशाच्या भावी विकासाची पायाभरणी होय. म्हणून प्रत्येक बालक शाळेत येणे व प्रत्येक बालकास गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त होणे हाच शिक्षणाचा ध्यास असायला हवा. प्रत्येक बालकाला शिक्षणाचा हक्क आहे. यासाठीच शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाप्रमाणेच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्न सुरु झाले आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील सर्वांनाच गुणवत्तेचा ध्यास लागला आहे.

शिक्षण व्यवस्थेत शिकवण्याच्या अंगाने विचार होण्यापेक्षा शिक्षण घेणायाच्या शिकण्याच्या अंगाने विचार व्हावा. शाळेचे कार्य शिकवण्याचे नाही तर शिक्षणाची गोडी लावण्याचे आहे याचा विचार करुन शासनाचे धोरण हे विद्यार्थीभिमुख असावे. शिक्षण हक्क कायदयाने मुले, पालक, आणि शासन या तिघांनाही जबाबदारी दिली आहे. मुलांनी शिकले पाहिजे,पालकांनी त्यांना शिकण्याची मुभा दिली पाहिजे आणि शासनाने सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. यासाठी शिक्षण हक्क सारखा अधिनियम आवश्यकच आहे. शिक्षण हक्क कायदा समाजातील तळागाळातील सर्व मुलांसाठी अमलात यावा यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

शाळांमध्ये पायाभूत सुविधा आवश्यक आहेत ही गोष्ट वादातीत आहे. मात्र फक्त पायाभूत सुविधांच्या उभारणीतून शिक्षणाचा दर्जा उंचावणार नाही. फाइव्ह स्टार दिसणाया शाळा चकाचक, सर्व सोयींनी परिपूर्ण दिसतात मात्र म्हणून त्या उत्तमच असतात असे नाही. तरी देखील बालकांना आवश्यक त्या भौतिक सुविधा मिळणे गरजेचे आहे. तरच बालक शाळेत दाखल होतील व शिक्षण प्रवाहात टिकून राहतील. आपल्याकडे शिक्षणावर सर्वात कमी खर्च केला जातो. शिक्षण हक्क अधिनियम हा स्वागतार्हच आहे. त्यामागचा उद्देश नक्कीच चांगला आहे,पण हे शिवधनुष्य पेलण्याची

ताकद शासकीय यंत्रणेत आहे का? पायाभूत सुविधा नसतील तर हा अधिनियम कागदावरच राहणार का?शाळांना पायाभूत सुविधा निर्माण करुन देण्यासाठी शासन,समाज काय मदत करतात? या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठीच संशोधिकेने प्रस्तुत विषयाची निवड संशोधनासाठी केली आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

प्रस्तुत संशोधनासाठी फक्त भिवंडी तालुक्यातील प्राथमिक शाळांची व शिक्षकाची निवड केली आहे.

**संशोधन नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी भिवंडी तालुक्यातील ५० प्राथमिक शिक्षकांचा न्यादर्श घेण्यात आला आहे. त्यांची निवड यादृच्छिक पध्दतीने करण्यात आली आहे.

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनासाठी स्वरचित प्रश्नावली हे साधन वापरण्यात आले आहे.

**संशोधन पध्दती**

संशोधन समस्येच्या स्वरूपानुसार संशोधनासाठी वापरली जाणारी पध्दती निश्चित केली जाते. सदर संशोधन वर्तमानकाळाशी संबंधित असल्यामुळे वर्णनात्मक पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे.

**सांख्यिकी तंत्रे**

संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी कोष्टके तयार करणे, शेकडेवारी हे संख्याशास्त्रीय तंत्र वापरण्यात आले.

**संशोधनाचे निष्कर्ष**

सदर संशोधनात माहिती संकलनासाठी प्रश्नावली हे साधन वापरण्यात आले. शेकडेवारी वापरून माहितीचे विश्लेषण केले.

. ८२% प्राथमिक शिक्षकांच्या मते शाळांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार उपलब्ध भौतिक सुविधा पुरविलेल्या असल्याचे दिसून आले.

. ८६% प्राथमिक शिक्षकांच्या मते पुरविलेल्या भौतिक सुविधांमुळे आपल्या प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना फायदे झाल्याचे दिसून आले.

३. ७८% प्राथमिक शिक्षकांच्या मते आपल्या शाळेत 'अपंग समावेशित शिक्षणाच्या सुविधांची' उपलब्धता शासनाने पुरविल्याचे दिसून आले.
४. ९६% प्राथमिक शिक्षकांच्या मते आपल्या शाळेची इमारत असल्याचे दिसून आले. .
५. ९०% प्राथमिक शिक्षकांच्या मते आपल्या प्राथमिक शाळेत प्रसाधनगृहे स्वच्छ व आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी रनिंग वॉटरची पुरेशी पाण्याची उपलब्धता करुन दिल्याचे दिसून येते.
६. ८४% प्राथमिक शिक्षकांच्या मते आपल्या प्राथमिक शाळेत विदयार्थी व वर्गसंख्येनुसार आवश्यक वर्गखोल्या उपलब्ध असल्याचे दिसून आले.
७. २८% प्राथमिक शिक्षकांच्या मते शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार आपल्या प्राथमिक शाळेत प्रयोगशाळा असल्याचे दिसून आले.
८. ४३% प्राथमिक शिक्षकांच्या मते शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार आपल्या प्राथमिक शाळेत स्वतंत्र कक्ष असल्याचे दिसून आले.
९. ४२% प्राथमिक शिक्षकांच्या मते स्वतंत्र कक्ष उपलब्धतेमुळे आपल्या प्राथमिक शाळेत सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून आले.
१०. ८८% प्राथमिक शिक्षकांच्या मते आपल्या प्राथमिक शाळेत क्रीडागंण व क्रीडासाहित्य वापरामुळे विदयार्थ्यांचा शारीरिक विकास झालेला दिसून आला.
११.६४% प्राथमिक शाळेत विविध कार्यालयासाठी स्वतंत्र खोल्या असल्याचे दिसून आले.

वरील संशोधनाअंती असे आढळून आले की, शाळांच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा झाली. 'अपंग समावेशित शिक्षणाच्या सुविधांच्या' उपलब्धतेमुळे सर्वच घटक शिक्षण प्रवाहात सहभागी झाले. मुलांमुलींसाठी असलेल्या स्वतंत्र स्वच्छतागृहांच्या उपलब्धतेमुळे मुलींच्या प्रवेशात वाढ झाली. रनिंग वॉटरची व पुरेशी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करून दिल्याने बालकांचे आरोग्य सुधारले व नियमित उपस्थित राहू लागले. क्रीडागंण उपलब्धतेमुळे बालकांना खेळाची आवड निर्माण झाली. क्रीडागंण व क्रीडासाहित्य वापरामुळे विदयार्थ्यांचा शारीरिक विकास झालेला दिसून आला.

उच्च प्राथमिक शाळांची संख्या कमी असल्याने त्याप्रमाणात त्या शाळांमध्ये प्रयोगशाळा असल्याचे दिसून आले. वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागणे, निरीक्षणशक्ती विकसित होणे, चिकित्सकवृत्ती वाढीस लागणे, विज्ञान प्रदर्शनात विदयार्थी स्वत: साहित्य/उपकरण तयार करून सहभागी होणे असे फायदे प्रयोगशाळांमुळे झाले. प्राथमिक शाळेत स्वतंत्र कक्ष असल्याचे दिसून आले, परंतु वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण यामुळे जागेची कमी कमतरता असल्याकारणाने प्राथमिक शाळांमध्ये कमी प्रमाणात स्वतंत्र कक्ष उपलब्धता असल्याचे दिसून आले.

चांगल्या भौतिक सुविधा, शैक्षणिक साधनांची उपलब्धता यामुळे शिक्षणाच्या दर्जात सुधारणा झाली.बालके शाळेत रमू लागली व उपस्थितीचे प्रमाण वाढले, शाळेविषयी आस्था वाढली तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण बालकांना मिळू लागले. शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार पुरविलेल्या भौतिक सुविधांचे असे अनेक सकारात्मक परिणाम दिसून आले.या अधिनियमामुळे शाळांच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा झाल्या, उदा. शाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली. स्वतंत्र स्वच्छतागृहांच्या उपलब्धतेमुळे मुलींच्या प्रवेशात वाढ झाली. चांगल्या भौतिक सुविधा, शैक्षणिक

साधनांची उपलब्धता यामुळे शिक्षणाच्या दर्जात सुधारणा झाली. बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळू लागले. सर्व घटकातील बालक शिक्षण प्रवाहात सामील झाले.

**संदर्भसूची**


१. भिंताडे वि. रा., (२००९) 'शैक्षणिक संशोधन पध्द्ती' नित्यनुतन प्रकाशन पुणे —३०.
२. मुळे रा. श., उमाठे वि. तु. (१९८७) 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे_' महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती, नागपुर.
३. जरग नामदेव (संपादक); 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ — मार्गदर्शिका २०१२', महाराष्ट राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणेः ३०.
४. कायंदे पाटील गंगाधर वि.; 'संशोधन पध्दती', चैतन्य पब्लिकेशन्स, २००९, नाशिकः १३
५. 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९', तृतीय आवृत्ती, ऑक्टों. २०१२